लोकमत

# 'इट राइट मिलेट मेला'चे आज आयोजन

## विद्यापीठात उपक्रमाचे आयोजन : के. के. जिथा यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ व भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणतर्फे आज, सोमवारी शिवाजी विद्यापीठात भरडधान्य जागृतीसाठी इट राइट मिलेट मेला उपक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, भारतीय अन्नसुरक्षा आणि भारतीय अन्नसुरक्षा व मानक प्राधिकरणाच्या पश्चिम विभागाच्या सहसंचालक के. के. जिथा यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या फूड सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी व तंत्रज्ञान अधिविभागाच्या पुढाकाराने होणाऱ्या या उपक्रमाची सुरुवात सोमवारी सकाळी ६:३० वाजता एरोबिक्स व्यायामाने होणार आहे. भरड धान्याच्या जनजागृतीसाठी विद्यापीठ परिसरात तीन कि.मी.ची वॉकथॉन आयोजित केली आहे. यात सहभागींना मोफत टी-शर्ट दिले जाणार आहेत. सकाळी १०:३० वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात या कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, भारतीय अन्नसुरक्षा, मानक प्राधिकरणच्या अधिकारी प्रीती चौधरी, कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी भारतीय अन्नसुरक्षा व मानक प्राधिकरणाच्या पश्चिम विभागाचे उपसंचालक डॉ. के.यू. मेथेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस.एन. सपली, अन्नविज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. पी.डी. पाटील, डॉ. इरण्णा उडचाण, डॉ. उदयसिंह पाटील, डॉ. गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

### भरडधान्य प्रदर्शनात काय असणार

विद्यार्थी व स्वयंसहायता बचत गटाचे भरड धान्याचे दहा स्टॉल लावण्यात येणार आहेत. यावेळी फोटोग्राफी, टेक्निकल पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात येणार आहेत. याशिवाय सापशिडी, दोरीवरच्या उड्या हे खेळही खेळण्यात येणार आहेत. भरड धान्याचा दैनंदिन आहारात समावेश या विषयावर दुपारी ३ वाजता चर्चासत्र आयोजित केले आहे.

पुढारी

# विद्यापीठात आज ईट राईट मिलेट मेला

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ व भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण (आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २८) सकाळी ६.३० ते सायंकाळी ६ यावेळेत ईट राईट मिलेट मेलाचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह येथे सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा पोलीसप्रमुख महेंद्र पंडित, सेफ्टी स्टँडर्ड ऑफ इंडियाचे अधिकारी प्रीती चौधरी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

तरूण भारत

# विद्यापीठात आज 'इट राईट मिलेट मेला' उपक्रम

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आज (दि. २८ ) सकाळी ६.३० वाजता 'इट राईट मिलेट मेला' या कार्यक्रमाचे उद्घाटन 'वाक्योथोन' कार्यक्रमाने होणार आहे. राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात मनोरंजन, खेळ, चर्चासत्रांच्या माध्यमातून भरडधान्यांचे महत्व पटवून दिले जाईल. जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा पोलीस प्रमुख महेंद्र पंडीत, फूड व सेफ्टी स्टँडर्डस ऑफ इंडियाचे अधिकारी प्रीती चौधरी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्र मुंबई जॉईट डायरेक्टर के. के. जीथा, डेप्युटी डायरेक्टर के. यु. मेथेकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी

# कुलसचिव पदासाठी उद्या होणार मुलाखती

## १६ पात्र उमेदवार रिंगणात; सात सदस्यीय निवड समिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अखेर दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शिवाजी विद्यापीठ कुलसचिव पदाच्या मुलाखतीसाठी मुहूर्त सापडला आहे. या पदासाठी १६ पात्र उमेदवारांच्या मंगळवारी (दि. २९) मुलाखतीची प्रक्रिया पार पडणार आहे. यात विद्यापीठातील चार जणांचा समावेश आहे.

विद्यापीठाचे तत्कालीन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा कार्यकाल नोव्हेंबर २०२१ मध्ये संपला. दोन वर्षांपासून विद्यापीठाचा कार्यभार प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्याकडे आहे. विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव पदासाठीची प्रक्रिया राबविली गेली. मात्र, दोनवेळा विविध कारणांमुळे पात्र उमेदवार मिळाला नाही. त्यानंतर २० जुलै २०२२ रोजी पुन्हा प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यामधून १६ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत. यात प्रभारी कुलसचिव डॉ.



व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव संजय कुबल, डॉ. मुरलीधर भानरकर, पुणे विद्यापीठाचे परीक्षा संचालक महेश काकडे यांच्यासह धनंजय ठोंबरे, प्रमोदकुमार शिरोटे, रविकुमार नाईक, विजय कुंभार, श्रीकांत अंधारे, प्रकाश पाटील, सचिन कदम, मलिक रोकडे, रिमेथ दायस, बाजीराव पाटील, परशराम शहापूरकर यांचा समावेश आहे. सात सदस्यीय निवड समितीकडून ही प्रक्रिया राबविली जाणार आहे. कुलसचिवपदी कोणाची वर्णी लागते? याकडे शिक्षणक्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे.

तरूण भारत

# पर्यावरणीय जीवनशैलीमुळे पृथ्वीचे संरक्षण

▪ डॉ. प्रमिला बत्तासे यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रत्येकांनी शाश्वत पर्यावरणपुरक जीवनशैलीचा स्वीकार केल्यास पर्यावरणाचं संरक्षण तर होईलच व भावी पिढ्यांचे भवितव्यही उजळु शकते. प्रत्येकाची छोटी कृतीही महत्वाचं पाऊल ठरू शकते. दैनंदिन पर्यावरणीय जीवन पद्धतींचा अवलंब केला, तर पृथ्वीचे संरक्षण होऊ शकते, असे प्रतिपादन उद्योजिका व पर्यावरणवादी डॉ. प्रमिला बत्तासे यांनी केले. शिवाजी विद्यापिठाच्या इंग्रजी अधिविभागाच्यावतीने आयोजीत जी २० आणि पर्यावरण पूरक जीवनशैली व्याख्यानमालेत बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.

डॉ. बत्तासे म्हणाल्या, निरोगी जीवनशैलीसाठी अक्षय ऊर्जा, कचरा कमी करणे, जैवविविधतेला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. टाकाऊपासून टिकाऊ वस्तूं निर्माण केल्याने कचरा कमी होतो. ऊर्जेचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी एलईडी दिव्यांचा वापर करावा. गरज नसताना घरातील पंखे आणि लाईटचे बटण बंद करा. उर्जेची बचत ही काळाची गरज असल्याचे सांगितले. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी प्रास्ताविक केले. पार्थ यादव यांनी सूत्रसंचालन केले. सचिन कामात यांनी आभार मानले. यावेळी हिंदी व इंग्रजी आधीविभागातील शिक्षक, विध्यार्थी उपस्थित होते.